स्थापना : दि. ५ मे २००८
नों.क्र.महा./२४९२९/को./११/०७/०८

शिविम
मराठी
॥ सामर्थ्य मायमराठीचं ॥
॥ विकसन MY बोलीचं ॥

# शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ,कोल्हापूर

अनुराज, ७/ब, सूर्यवंशी कॉलनी अ, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर- ४१६०१२

आणि

**श्री मुधाईदेवी शिक्षण संस्था, देऊरचे,**

## प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय देऊर,

**ता. कोरेगाव, जि. सातारा ४१५५२४**

या संस्थांमधील

# सामंजस्य करार

# MEMORANDUM OF UNDERSTANDING

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये

Rs. 100

रु. 100

ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2019 ◐ WL 469636

केवळ प्रतिज्ञापत्रासाठी (अनुच्छेद ४) / Only For Affidavit (Article 4)

TREASURY OFFICE SATARA

10 NOV 2020

B

STAMP HEAD CLERK

श्री अशोक कामी

प्राचार्य

प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊर

हे-सुंदर सुखदेव

१०५८३)

11 NOV 2020

भामटी आशा सुनिल पांडेकर

परवाना क्र. २३०१०२०

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्या पासून ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे

**शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर**

**आणि**

**श्री मुधाईदेवी शिक्षण संस्था, देऊरचे, प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय देऊर,**
**ता. कोरेगाव, जि. सातारा ४१५५२४**

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ कोल्हापूर हे विद्यापीठीय मराठी शिक्षक आणि महाराष्ट्रातील साहित्य आणि भाषाप्रेमी यांचे संघटन आहे. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचे संवर्धन आणि विकसन करणे तसेच संशोधन करणे हे संघाचे ध्येय आहे.

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ कोल्हापूर

मराठी शिक्षकांच्या दर्जेदार अध्यापनासाठी ज्ञानप्रसार आणि संशोधन या संदर्भात विविध उपक्रम राबविले जातात. त्यानुसार विविध विषयांवर राष्ट्रीय चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळेचे आयोजन केले जाते. विविध महाविद्यालयातील चर्चासत्रे, कार्यशाळांमध्ये बौध्दिक सहयोगी होऊन सहकार्य केले जाते. विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेचे आणि साहित्याचे विकसन करण्याच्या दृष्टीने निबंधलेखन, कथालेखन, काव्यलेखन, कथाकथन, काव्यवाचन अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. तसेच मराठी प्राध्यापकांच्या शोधनिबंधांना पारितोषिक, ललित, ललितेतर, संपादीत ग्रंथांना पारितोषिक दिले जाते. संघामार्फत 'शिविम संशोधन पत्रिका' हे विद्वत्प्रमाणित (Pear Reviewed Research Journal) त्रैमासिक प्रसिध्द केले जाते. त्याचा ISSN No. 2319 - 6025 असून शिवाजी विद्यापीठ आणि यु.जी.सी. मान्यताप्राप्तयादीमध्ये पत्रिकेचा समावेश झालेला आहे.

वरील नमूद केलेल्या **शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर-४१६०११ आणि प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय देऊर, ता. कोरेगाव, जि. सातारा-४१५५२४ या संस्था दिनांक** 07/2/2021 रोजी एकमेकांबरोबर सामंजस्य करार करत आहेत. या कराराची उद्दिष्टये खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहेत.

- **उद्दिष्टये**

१. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचे संवर्धन करणे आणि विविध विषयांवर संशोधन प्रकल्प राबविणे.

२. चर्चासत्र, कार्यशाळा, परिसंवाद, काव्यसंमेलन, साहित्यसंमेलन, संयुक्त बैठका यांचे आयोजन करणे

३. विद्यापीठीय अभ्यासक्रम, प्रमाणपत्र, पदविका कोर्ससाठी सहयोग व सहकार्य करणे.

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ कोल्हापूर

४. निबंध, वक्तृत्व, वाद-विवाद, प्रश्नमंजुषा, कथालेखन, काव्यलेखन, काव्यवाचन, कथाकथन स्पर्धांचे आयोजन करणे.

५. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रासाठी सहकार्य करणे.

६. व्यक्तिमत्त्व विकास प्रकल्प, कौशल्य विकास प्रकल्प राबविणे.

७. दरवर्षी कोल्हापूर, सांगली, सातारा या शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये संघाचे वार्षिक एक/दोन दिवसांचे अधिवेशन विविध साहित्य विषयांवर घेणे. सदर अधिवेशनात प्राध्यापकांच्या शैक्षणिक तसेच विषयाच्या समस्यांवर चर्चा करणे.

८. सर्जनशील लेखन, उपयोजित मराठी लेखन प्रकल्प राबविणे.

९. मोडी लिपी, मुद्रितशोधन, पत्रकारिता इत्यादी अभ्यासक्रमांचे आयोजन करणे.

१०. ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी सहकार्य करणे. ग्रंथाचे प्रकाशन व चर्चा घडवून आणणे.

११. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती या संबंधाने येणाऱ्या समस्या व अडचणी विद्यापीठ, शासन आणि विद्यापीठ अनुदान आयोग, दिल्ली यांना यासंदर्भात सूचना-पत्रव्यवहार करणे.

१२.'शिविम संशोधन पत्रिका' हे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक प्रसिध्द करणे.

- **एकमेकांना सहाय्य करण्याची प्रस्तावित माध्यमे**

१. परस्पर हिताच्या शैक्षणिक बाबींमध्ये तसेच प्रशिक्षणामध्ये सहकार्य करणे.

२. विविध उपक्रमाचे आयोजन करण्यासाठी परस्परांशी सहकार्य करणे

३. उपलब्ध साधनसामुग्रीनुसार या संस्थाकडून एक निश्चित योजना तयार करणे.

४. त्रैमासिकाव्दारे साहित्य, विचार यांची देवाणघेवाण करणे.

५. दरवर्षी संघाचे अधिवेशन विविध कॉलेजवर आयोजित करुन विचारविनीमय करणे.

६. शासन, साहित्य अकादमी, मराठी साहित्य व संस्कृती महामंडळ, राज्य मराठी विकास संस्था यांचे उपक्रम सौजन्याने राबविणे.

- **अटी आणि शर्थी**

१. संघाच्या सर्व कार्यक्रमामध्यें, अधिवेशनामध्ये चर्चासत्रामध्ये आणि उपक्रमामध्ये महाविद्यालयातील मराठी विभागाने तसेच संघाच्या सभासदांनी सहभागी होणे, हजर रहाणे बंधनकारक आहे.

२. संघाचा एखादा कार्यक्रम, उपक्रम महाविद्यालयाने राबवायचा असल्यास संकल्पित आर्थिक तरतूद संघ करेल मात्र महाविद्यालयाने सर्व सुविधा पुरवाव्यात. सदर कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य, संस्थेचे पदाधिकारी यांना समारंभात योग्य स्थान देवुन त्यांचा संघाने योग्य असा सन्मान करणे बंधनकारक आहे.

३. महाविद्यालयाने चर्चासत्र, कार्यशाळा, परिसंवाद अशा कार्यकमाचे आयोजन करायचे असल्यास संघाला बौद्धिक सहयोगी करून घेणे बंधनकारक आहे. सदर कार्यक्रमास संघ संपूर्ण सहकार्य करेल. निमंत्रणपत्रिका, प्रमाणपत्र, बॅनर यावर संघाचे नाव,बोधचिन्ह आणि अध्यक्ष/ सचिव यांची नावे असावीत. अध्यक्ष/ सचिव यांना समारंभात योग्य स्थान देवुन त्यांचा प्रवास खर्च द्यावा.

४. परस्पर सामंजस्य करारातील उदाहरणांचे नुतनीकरण करणे आणि परस्परांच्या लेखी करारांची कोणत्याही क्षणी समाप्ती केली जाऊ शकते. साठ दिवसांच्या पूर्व लेखी सूचनेनुसार दोन्हीपैकी कोणत्याही संस्थेला करार संपुष्टात आणता येईल.

५. सदर परस्पर सामंजस्य कराराचा कालावधी पाच वर्षानंतर संपुष्टात येईल. परस्पर सहमतीने आणखी पाच वर्षासाठी हा करार पुढे चालू ठेवता येईल.

६. यासाठी निश्चित दिनांक व लेखी अनुमती यांची आवश्यकता बंधनकारक असेल.

- **समन्वय आणि अंलबजावणी**

१. सदर कराराची जबाबदारी, समन्वय आणि अंलबजावणीसाठी शिक्षक संघाचे अध्यक्ष, सचिव कार्यरत राहतील. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य, विभागप्रमुख, आणि समन्वयक काम करतील.

२. सदर सामंजस्य करार १०० रुपयेच्या स्टँपपेपरवर, कायदेशीर भाषेमध्ये तसेच कायदेशीर अटीशी अधीन राहून तीन प्रतीमध्ये अंमलात येत आहे.

३. सदरहू परस्पर सामंजस्य करार हा पुढील समन्वयिक अधिकाऱ्यात होत आहे, तसेच वर नमूद केलेल्या दिनांक व वर्षानुसार अंमलात येत आहे.

**प्रा. डॉ. अशोक शेलार**
**समन्वयक विभाग प्रमुख**
प्रमुख
मराठी विभाग,
प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय,
देऊर (सातारा)

**डॉ. भारत भोसले**
**प्राचार्य**
डॉ. बी. एन. भोसले
प्राचार्य,
संभाजीराव कदम महाविद्यालय,
देऊर, ता. कोरेगांव, जि. सातारा.

**प्रा. डॉ. प्रकाश दुकळे**
**सचिव**

**प्रा. डॉ. शिवकुमार सोनाळकर**
**अध्यक्ष**

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

**प्रा. दत्तू मेंगाळ**
**सहसमन्वयक**

**प्रा. हर्षल पवार**
**ग्रंथपाल**
Librarian
Prof. Sambhajirao Kadam College
Deur, Tal. Koregaon, Dist. Satara